2 MAY 2001

अपंग मुलांना प्राथमिक व माध्यमिक शाळेत प्रवेशासाठी आरक्षण.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण विभाग,
शासन निर्णय, क्रमांक अपंग १०२०/(२३७२)/प्राशि-१.
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २७ एप्रिल २००१

शासन निर्णय:

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार अपंग मुलांना नियमित शाळेत दाखल करणे आवश्यक आहे. अपंग मुलांना विशेष शाळांमधून शिक्षण देण्यापेक्षा नियमित शाळांतून एकात्मिक शिक्षण दिल्यास ते अधिक हितकारक आहे. अपंग व्यक्तींसाठी केंद्र शासनाने अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५ लागू केला आहे. या अधिनियमानुसारही अपंग मुलांना नियमित शाळापध्दतीमध्ये दाखल करुन घेणे आवश्यक आहे. अपंग मुलांच्या शैक्षणिक हिताच्यादृष्टीने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तसेच मान्यताप्राप्त खाजगी संस्थांच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये अपंग मुलांना प्रवेशासाठी ३ टक्के जागा राखून ठेवण्यात येत आहेत. यापुढे प्रवेशासाठी उपलब्ध असलेल्या किमान ३ टक्के जागांवर अपंग मुलांना प्रवेश देण्यात यावा. प्रवेश देण्याच्या अखेरच्या दिवसापर्यंत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या अपंग मुलांना प्रवेश दिल्यानंतर ३ टक्के आरक्षणापैकी जागा रिक्त राहिल्या तर त्यावर अन्य मुलांना प्रवेश देण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( शा. पां. जोशी )
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति

शिक्षण संचालक (प्राथमिक शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे.
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे
संचालक , राज्य शैक्षणिक तंत्रज्ञान संस्था, पुणे
शिक्षण संचालक (प्रौढ शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, जवाहर बालभवन, चर्नीरोड, मुंबई
संचालक , महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था, औरंगाबाद.
संचालक, शासकीय परीक्षा मंडळ, पुणे
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक /माध्यमिक), जिल्हा परिषद
सर्व जिल्हाधिकारी
सर्व प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळे
मुख्य अधिकारी, विदर्भ व मराठवाड्यातील सर्व नगरपालिका, नगरपरिषदा
सर्व शिक्षणाधिकारी, महानगरपालिका
प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
ग्रामविकास विभाग , आदिवासी विकास विभाग, समाजकल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
शालेय शिक्षण विभागातील सर्व कार्यासने. निवड नस्ती, कार्यासन प्राशि-१.

C:\REKHA\APNG 2372